पोलीस आयुक्त,ठाणे शहर अंर्तगत

निजामपुरा पोलीस स्टेशन,भिवंडी जि.ठाणे

Email ID- cp.thane.nizampura@mahapolice.gov.in

दुरध्वनी क्रमांक फोन ०२५२२-२५०२५०

दिनांक - १६/०५/२०२६

प्रेस नोट

आरोपी नामे ऋतीक मुर्कींदा बामणे, वय २३ वर्षे, रा. गुरूनाथ पाटील बिल्डींग, काटईगावा, भिवंडी, जि. ठाणे याने फिर्यादी यांच्या गळयातील चैन जबरीने हिसकावुन चोरी केली म्हणुन निजामपुरा पोलीसांनी आरोपीस २४ तासाच्या आतमध्ये अटक

निजामपुरा पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. २८०/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४) प्रमाणे दाखल गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक/जीवन म्हस्के करत असुन नमुद गुन्हयाच्या घटनास्थळी तसेच इतर ठिकाणी असलेले सी. सी. टि. व्हि. फुटेज प्राप्त केले असता फुटेजमध्ये एक इसम फिर्यादी यांच्या पाठीमागुन येवुन फिर्यादी यांच्या गळयातील सोन्याची चैन खेचुन चोरी करून घेवुन पळुन जात असतांना दिसुन आला. सदर माहीती मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक/विश्वास डगळे तसेच मा. पोलीस निरीक्षक (गुन्हे),यांना दिली असता त्यांनी पोलीस उप निरीक्षक/जीवन म्हस्के, पोहवा/५०७७ कांबळे, पोना/२९३६ कोदे, पोशि/१९६३ सांबरे, पोशि/७९९९ पवार, पोशि/३९१२ कोळी, पोशि/२२०६४ खंदारे असे तपास पथकास रवाना केले असता प्राप्त फुटेज मधील अज्ञात आरोपीचा प्राप्त फोटो प्रमाणे तपास पथकाने त्यांच्या गुप्त बातमीदांराना माहीती देवुन आरोपीचा शोध घेतला असता आरोपीत हा काटई, भिवंडी येथे राहत्या घरी मिळुन आला त्यास ताब्यात घेवुन त्यास त्याचे त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव ऋतीक मुर्कींदा बामणे, वय २३ वर्षे, रा. गुरूनाथ पाटील बिल्डींग, काटईगावा, भिवंडी, जि. ठाणे मो.क्र. ७२१९७४०५६४ असे सांगितले त्यास निजामपुरा पोलीस ठाणे येथे पोलीस निरीक्षक(गुन्हे), निजामपुरा पोलीस ठाणे भिवंडी यांच्या दालनामध्ये हजर केले असता त्यांनी सदर इसमास गुन्हयाबाबत विचारणा केली असता आरोपीने सदर गुन्हयाची कबुली दिली आहे नमुद आरोपीकडे गुन्हयाच्या अनुषंगाने अधिक तपास करून गुन्हयातील जबरीने चोरी झालेला १ तोळे वजनाची सोन्याची चैन असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

तरी सदर उत्कुष्ट कामगिरी मा.पोलीस आयुक्त,ठाणे शहर श्री.आशुतोष डुंबरे सो., मा. पोलीस उप आयुक्त श्री.शशिकांत बोराडे, सो., परिमंडळ-२ भिवंडी व मा. सहा.पोलीस आयुक्त श्री. डॉ. विजय मराठे सो.,पश्चिम विभाग भिवंडी मा. वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो, विश्वास डगळे सो, मा.पोनि. समाधान पाटील (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाने व निजामपुरा पोलीस ठाण्याचे तपास पथकाचे पोउपनिरी/म्हस्के, तसेच अंमलदार पोहवा/५०७७ कांबळे, पोना/२९३६ कोदे, पोशि/१९६३ सांबरे, पोशि/७९९९ पवार, पोशि/३९१२ कोळी, पोशि/२२०६४ खंदारे यांनी आरोपीस २४ तासाच्या आतमध्ये अटक करण्याची तत्कुष्ट कामगीरी केलेली आहे.


महाराष्ट्र पोलीस